# जिल्हा व सत्र न्यायालय
# नांदेड – ४३१ ६०१

E-mail : mahnandc@mhstate.nic.in
Telephone No. : 02462 - 234555, 244683. Fax No. : 02462-244682


## निविदा सुचना

यादवारे कळविण्यात येते की, जिल्हा न्यायालय,नांदेड व अधिनस्त सर्व न्यायालयातील बेलीफ यांना लेदरबॅग आणि रेनकोट पुरवठा करावयाचा आहे. त्यासाठी खालील नमुद अटी व शर्तीवर इच्छुक पुरवठादारंकडुन निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | तपशील | परिमाण | पुरवठा करावयाचे आहे ते ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | लेदरबॅग | ४१ नग | जिल्हा न्यायालय, नांदेड |
| २ | रेनकोट | ७९ नग | |
| | Size XL- 41 | | |
| | XXL - 37 | | |
| | XXXL - 1 | | |

त्याकरिता इच्छुक पुरवठादारांकडून लेदरबॅग आणि रेनकोटच्या **सर्व करांसहित प्रति लेदरबॅग आणि रेनकोट दराचा** समावेश आणि **सॅम्पल बॅग आणि रेनकोट** असलेली सीलबंद निविदा या कार्यालयास **दिनांक : ०९ मे २०२४** रोजीपर्यंत किंवा त्यापुर्वी कार्यालयीन वेळेत पोहचतील या बेताने पाठविण्यात यावेत. निविदेमध्ये मागणी केलेली लेदरबॅग आणि रेनकोट त्वरित व उधारीवर पुरवठा करण्याची तयारी पुरवठादाराची असावी, कोषागारातुन देयक पारित झाल्यावर पुरवठादारास देयकाची रक्कम प्रदान करण्यात येईल.

सीलबंद लिफाफा **"मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, नांदेड "** यांचे नावे **'' लेदरबॅग आणि रेनकोट पुरवठा निविदा"** असे ठळक अक्षरात लिहुन द्यावे.

### निविदा खालील अटींवर मंजूर करण्यात येईल.

- मागणी केलेल्या लेदरबॅगचा पुरवठा जिल्हा न्यायालयात करण्याची व्यवस्था पुरवठादाराकडे राहिल. त्यासाठी वाहतूक, हमाली किंवा इतर कोणतेही खर्च/भत्ते अनुज्ञेय असणार नाहीत.
- पुरवठा करण्यात आलेला लेदरबॅग आणि रेनकोट मागणीनुसार असल्याची खातरजमा झाल्यानंतरच आपले उधारी देयक उपलब्ध अनुदानानुसार तसेच, कोषागारातुन देयक पारित झाल्यानंतर पुरवठादारास कार्यालयीन कामकाजानुसार ऑनलाईन रक्कम/धनादेश अदा करण्यात येईल.
- प्राप्त निविदा मंजूर अथवा रद्द करण्याचे संपुर्णत: अधिकार या न्यायालयास राहतील.
- निवीदा दाखल करणाऱ्या पुरवठादाराकडे GST/सेल्स टॅक्स नंबर असणे आवश्यक आहे.

मागे पहा..

- देयक अदा केल्यानंतर देयकाची पावती सादर करावी लागेल.
- सदरहू निवीदेमध्ये कोणत्याही क्षणी कोणत्याही कारणाशिवाय बदल, दुरूस्ती किंवा सुधारणा करण्याचा अधिकार या कार्यालयाने राखून ठेवला आहे.
- सदरहू करण्यात आलेला दरकरार/निवीदा कोणत्याही क्षणी कोणत्याही कारणाशिवाय मंजूर अथवा रद्द करण्याचा संपूर्णतः अधिकार हा या कार्यालयाचा राहील.
- निविदेबाबतच्या विवादासाठी न्यायिक क्षेत्र नांदेड असेल.
- तसेच निविदाधारकाची निविदा मंजूरीनंतरही प्रत्यक्ष खरेदी करतेवेळी शासनाच्या GeM Portal वरील दर पाहून GeM वरील दर कमी असल्यास GeM Portal वरुन खरेदी करण्याचे स्वातंत्र्य या कार्यालयास राहिल.

आदेशावरुन,

प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, नांदेड

जिल्हा न्यायालय, नांदेड }
दिनांक : ०४.०५.२०२४ }

जावक क्रमांक/वित्त विभाग/ ५०९६/२०२४

प्रति,

०१) अश्विनी ट्रेडर्स जुना मोंढा, नांदेड
०२) भानु लगेज सेटंर, श्रीनगर, नांदेड
०३) लिडकॉम संत रोहीदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ नांदेड
०४) सफर लगेज, जी जी रोड नांदेड
०५) न्यु आशापुरा सुटकेस सेंटर, नांदेड
०६) जिल्हा न्यायालय, नांदेड यांचे नोटीस बोर्ड
०७) दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, नांदेड यांचे नोटीस बोर्ड
०८) मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालय, नांदेड यांचे नोटीस बोर्ड
०९) जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांचे नोटीस बोर्ड
१०) जिल्हा परिषद, नांदेड यांचे नोटीस बोर्ड
११) नांदेड वाघाळा महानगर पालिका, नांदेड यांचे नोटीस बोर्ड

आदेशावरुन,

प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, नांदेड

जिल्हा न्यायालय, नांदेड }
दिनांक : ०४.०५.२०२४ }